जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२९/१२/२०२४
## दि.२८/१२/२०२४ रोजी रात्री ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ४०५/२०२४,भा.न्या.सं.कलम ३०९(४),११५,३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २६ वर्ष,रा.आंबेगाव पठार,पुणे |
| **आरोपीत** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/१२/२०२४ रोजी पहाटे ०३/०० ते ०३/३० वा.सुमा.रामेश्वर चौकाच्या जवळ रोडवर, मंडई.पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा मित्र असे दगडूशेठ दत्त मंदिर या ठिकाणी काकडा आरती करिता आले असताना नमुद वेळी ते लघूशंकेसाठी नमुद ठिकाणी गेले असता एका रिक्षामधुन आलेल्या नमुद तीन अनोळखी इसमांनी फिर्यादींना मारहाण करून फिर्यादींच्या गळयातील ५०,०००/-रू.कि.ची सोन्याची चैन हिसकावून जबरी चोरी करून नेली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.वाघमारे मो.नं.८६९१९३००२४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ७८१/२०२४,भा.न्या.सं.कलम ३३१(३),३३१(४),३०५ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४० वर्षे रा.वडगाव बुा,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/१२/२०२४ रोजी सांय १७/०० वा.सुमा.ते दि.२८/१२/२०२० रोजी स. ०९/३० वा चे दरम्यान सं.नं.६/१९९,देवभुमी बंगला,वेणुताई कॉलेज रोड,भन्साळी कॅम्पसजवळ,वडगाव बुा,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे आई वडील नमुद ठिकाणी राहण्यास असुन ते बाहेरगांवी गेले असल्याने त्यांचे नमुद ठिकाणाचे बंगला हा कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे बंगल्याचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून बंगल्यातील रोख व सोन्याचे दागिने असा एकुण १२,४०,०००/- रू.कि.चा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.निकम मो.नं.९८२३२०७७४६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे ३३४/२०२४,भा.न्या.सं.कलम ३०९(६),३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २४ वर्ष रा.सुखसागरनगर बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | तीन ते चार इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/१२/२०२४ रोजी संध्या.१९/०० वा.अप्पर टेपो बाजुकडील रोडने चामुंडा स्वीट कडे जात असताना भुत बंगला जवळ |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे काम संपवून नमुद ठिकाणाहुन घरी जात असताना नमुद इसम हे एका मुलाला मारहाण करीत होते तेव्हा फिर्यादी यांनी त्याच्याकडे पाहीले असता त्यांनी फिर्यादीला पण मारहाण करून त्यांच्या खिशातुन १०,०००/-रु.किं.चा मोबाईल काढून घेतला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अशोक येवले मो.नं.८८८८८०२२५२ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ३०५/२०२४,भा.न्या.सं.कलम ३०३(२) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५५ वर्षे,रा.पिंपळे निलख,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/१२/२०२४ रोजी स.११/०० वा ते ११/१५ वा दरम्यान संचेती बस स्टॉप,जंगली महाराज रोड शिवाजीनगर,पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणी बस मध्ये चढत असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने तेथील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा २,०८,०००/- रु.कि.चा ऐवज चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार काळे मो.नं.९६५७७१६६४५ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे ३३५/२०२४,भा.न्या.सं.कलम,१०६(१),१२५(ब),२८१,मो.वा.का.क.११९/१७७, १८४,१३४ (अ),(ब), |
| **फिर्यादी** | अशोक येवले, पोलीस उप-निरीक्षक बिबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे.शहर |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/१२/२०१४ रोजी रात्रौ ०३/४५ वा.च्या सुमा.पुष्प मंगल कार्यालयासमोर बिबेवाडी कात्रज चौक बिबवेवाडी पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम याने त्याचे कडील असलेल्या मोटर सायकल वरती इसम नामे कृष्णा लक्ष्मण ससाने यास पाठीमागे बसवून रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन अविचाराने, हयगयीने व बेदकारपणे विरूद्ध दिशेने गाडी चालवून नमुद ठिकाणी एका चारचाकी वाहनांस समोरून धडक देऊन.मोटार सायकलवर पाठीमागे बसलेला कृष्णा ससाने यास गंभीर जखमी करुन,त्यांचे मृत्यूस कारणीभूत होवून त्यास उपचाराची गरज असताना वेळीच त्यास उपचार न करता तसेच कोणास काही एक न कळवता जखमी इसम कृष्णा लक्ष्मण ससाने यास चिंतामणी देशमुख उर्दू शाळेच्या मोकळ्या पटांगण ग्राउंड येथे ठेवून परस्पर निघून गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अशोक येवले मो.नं.८८८८८०२२५२ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३५७/२०२४,भा.न्या.सं.कलम,३१९(२),३१८(४),२०४,३४०(२)आयटीॲक्ट ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३५ वर्ष रा.खडकी,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१२/२०२४ ते दि.०५/१२/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांच्याशी संपर्क साधुन हॉटेल रेंटिंगचे रिव्हीव टेड्रींग व प्रिपेड टास्क अशा वेगवेगळ्या नावाने टास्क पुर्ण करण्यास सांगुन जास्त कमिशन मिळण्याचे खोटे आमिष दाखवुन विश्वास संपादन करून पैसे पाठविण्यास भरीस पाडुन फिर्यादीची ८,०१,२५०/-रू.ची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्री. गजानन चोरमले मो.नं.९५९४५५३९९९ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ८६२/२०२४,भा.न्या.सं.कलम,३१९,(२),३१८(४)६१(१)आयटीॲक्ट ६६(सी)(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५७ वर्ष रा.येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/११/२०२४ ते २९/११/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांच्याशी संपर्क साधुन ते नॅशनल बँकेचे अधिकृत व्यक्ती असल्याचे भासवुन,बैंकचे के.वाय.सी.अपडेट नसल्यामुळे बँक खाते ब्लॉक करण्यात आले असून ते पुढे चालू ठेवण्याकरित ए.पी.के.फाईल पाठवून त्यांना के.वाय.सी.अपडेट करण्या करीता सांगुन फिर्यादीच्या खात्यामधुन १२,९५,०००/-रू.काढून घेवुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे).श्रीमती स्वाती खेडकर मो.नं.८८८८८०७६९९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**